<u>उलटतपास प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. एस.एस.गवाणकर यांचे मार्फत.</u>

०९. माझ्याकडे चंद्रकांत यांच्या वडिलांचे नाव विठ्ठल रावजी मटकर होते असा दर्शविणारा पुरावा आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी वरील प्रमाणे पुरावा आजरोजी पर्यंत दाखल केलेला नाही व मला सदरील पुरावा दाखल करण्यासाठी कुठलीही अडचण नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, विठ्ठल मटकर यांच्या वडिलांचे नाव रावजी मटकर होते असा दर्शविणारा कुठलाही पुरावा माझ्याकडे नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी वरील प्रमाणे पुरावा आजरोजी पर्यंत दाखल केलेला नाही व सदरील पुरावा दाखल करण्यासाठी कुठलीही अडचण नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, येसु मटकर यांना बाळा येसू मटकर या नावाचा मुलगा होता. हे म्हणणे खरे आहे की, बाळा मटकर यास रावजी व गोविंद हे दोन भाऊ होते असा दर्शविणारा कुठलाही कागदोपत्री पुरावा माझ्याकडे आजरोजी पर्यंत नाही. हे म्हणणे खरे आहे की, येसु मटकर यास रावजी व गोविंद ही दोन मुले होती व बाळाला आणखीन दोन मुले होती असा दर्शविणारा माझ्याकडे कागदोपत्री पुरावा नाही. हे म्हणणे खरे आहे की, बाळा मटकर यास कृष्णा मटकर हा मुलगा होता. हे म्हणणे खरे आहे की, कृष्णाला प्रतिवादी क्र.१ मिनाक्षी ही मुलगी आहे. मी दावा मिळकतीचे कागदपत्रे पाहिलेली आहेत. हे म्हणणे खरे आहे की, जयश्री, मंदा व छाया यांनी प्रतिवादी क्र.१ च्या हक्कामध्ये हक्कसोड पत्र केलेले आहे व त्याबाबतची नोंद फेरफार क्र.२२६८ ने घेतलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, जयश्रीचे लग्नानंतरचे नाव अनुपमा विठ्ठल सावंत आहे. हे म्हणणे खरे आहे की, मंदाचे लग्नानंतरचे नाव सविता सुनिल पांगम असे आहे. हे म्हणणे खरे आहे की, छायाचे लग्नानंतरचे नाव राधाबाई गोपाळ साटम असे आहे. हे मला माहीत नाही की, प्रतिवादी क्र.१ चा मुलगा अविनाश गावडे यास दावा मिळकत क्र.९५/१–ब गहाण ठेवून कर्ज काढून दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, जमीन गहाण ठेवल्याबाबत फेरफार क्र.२३६० यास आजरोजी पर्यंत मी आव्हान दिलेले नाही. हे मला माहीत नाही की, प्रतिवादी क्र.१ चा मुलगा प्रमोद महादेव गावडे यास दावा मिळकत क्र.९५/१–ब गहाण ठेवून कर्ज काढून दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, जमीन गहाण ठेवल्याबाबत फेरफार क्र.२३६२ यास आजरोजी पर्यंत मी आव्हान दिलेले नाही.

१०. हे म्हणणे खरे आहे की, कृष्णा बाळा मटकर हे मयत झाल्यानंतर प्रतिवादी क्र.१ चे नाव फेरफार क्र.२१४२ ने लागले होते त्यास मी आजरोजी पर्यंत मी आव्हान दिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, बाळा येसू मटकर याच्या मृत्यूनंतर नोंदविण्यात आलेला फेरफार क्र.८३५ यास आजरोजीपर्यंत मी आव्हान दिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, दि.३०/०१/२०१७ रोजी मी व भगवान दत्ताराम गायकवाडने सर्वे नं.६८ हिस्सा नं.१० मधील पांढरा ऐन, काळा ऐन व आकेशी ही झाडे तोडली होती. हे म्हणणे खरे आहे की, झाडे तोडण्याच्यापूर्वी जमीन मालकाची व वन विभागाची कुठलीही परवानगी घेतलेली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, झाडे तोडल्याबाबत प्रतिवादी क्र.१ यांनी वृक्ष अधिकारी, कुडाळ यांच्याकडे माझी तक्रार केली होती. हे म्हणणे खरे आहे की, सदर तक्रारीचा क्र.९/२०१७ असा आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत प्रकरणामध्ये मी झाडे तोडली असल्याबाबत कबूल केले होते. हे म्हणणे खरे आहे की, सदर प्रकरणामध्ये परवानगी घेतली होती असा दर्शविणारा कुठलाही पुरावा मी सादर करु शकलो नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की, परवानगी न घेता झाडे तोडल्यामुळे मला दंड होणार होते ही बाब माहीत होती. हे म्हणणे खरे आहे की, झाडे तोडलेल्या जमिनीत आमचा हक्क आहे असा दर्शविणारा पुरावा सादर करतो असे मी सदर प्रकरणामध्ये सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की, मी पुरावा शोधला, परंतु, मला पुरावा न मिळाल्यामुळे मी प्रस्तुतचा दावा दाखल केला व त्याची प्रत वरील तक्रार प्रकरणामध्ये दाखल केली. हे म्हणणे खरे आहे की, वृक्ष अधिकाऱ्यांनी दावा दाखल केल्यामुळे कुठलाही दंड करु नये असा माझा आग्रह होता. हे म्हणणे खरे आहे की, वृक्ष अधिकाऱ्यांनी मला दंड केला होता व मी सदरचा दंड भरला होता.

११. हे म्हणणे खरे आहे की, रावजी, गोविंद, विठ्ठल व भगवान यांचा दावा मिळकतीमध्ये कुठलाही हक्क संबंध नव्हता व त्यांच्या गावामध्ये इतर मिळकती आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी चुकीचा दावा दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, सन १९५७ च्या पूर्वी तोंडी झालेल्या वाटपावरुन बाळा मटकर यांच्याकडे दाव्यातील वाद जमिनी वाटपास आल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, बाळा येसू मटकर यांच्याकडे वाद जमिनी बोट खत फेरफार क्र.२१८ प्रमाणे नोंद आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी व माझ्या पूर्वजांनी फेरफार

क्र.२१८ ला कधीही आव्हान दिलेले नाही. अंकुश विठ्ठल मटकर हे माझे चुलते होय. हे म्हणणे खरे आहे की, अंकुश विठ्ठल मटकर यांच्याकडे तोंडी वाटपानुसार गावातील अनेक मिळकती आलेल्या आहेत व त्याबाबत फेरफार क्र.४५ ने नोंद घेतलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, अंकुश विठ्ठल मटकर यांना वाटपानुसार मिळालेल्या सर्व मिळकती मला वारस तपासाने मिळालेल्या असून त्याबाबत फेरफार क्र.१८५३ ने नोंद घेतलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी फेरफार क्र.४५ व फेरफार क्र.१८५३ यास कधीही आव्हान दिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, भगवान गोविंद मटकर यांना तोंडी वाटपानुसार गावातील अनेक मिळकती मिळोल्या असून त्याबाबतची नोंद फेरफार क्र.२४६ ने घेण्यात आलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, भगवान गोविंद मटकर यांच्या पश्चात त्यांना मिळालेल्या मिळकती प्रतिवादी क्र.६ ते ८ यांना मिळालेल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, वरील मिळकतीत दत्ताराम मटकर व शंकर मटकर यांचा सुध्दा हक्क आहे. हे म्हणणे खरे आहे की, भगवान गोविंद मटकर यांना मिळालेल्या मिळकती बाबत त्यांच्या वारसांनी अथवा मी कधीही आव्हान दिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, तोंडी वाटपानुसार मिळालेल्या मिळकतीचे आम्ही सर्वजण एकमेव मालक आहे असे आम्ही मानल्यामुळे तोंडी वाटपास आम्ही कधीही आव्हान दिलेले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, दाव्यातील मिळकती या बाळा येसू मटकर यांच्या मालकीच्या आहेत.

१२. हे म्हणणे खरे आहे की, अंकुश विठ्ठल मटकर यांना तोंडी वाटपामुळे आलेल्या मिळकती व भगवान गोविंद मटकर यांना सुध्दा वाटपामध्ये आलेल्या मिळकती प्रस्तुत दाव्यामध्ये समाविष्ट केलेल्या नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, सर्वे नं.१३६ हिस्सा नं.३ ही मिळकत बाळा येसू मटकर यांच्यापासून विभक्त होवून विठोबा रावजी मटकर यांना तोंडी वाटपाने प्राप्त झालेली आहे व त्याबाबत फेरफार क्र.३८८ नुसार नोंद झालेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, सर्वे नं.१३६ हिस्सा नं.३ ही मिळकत सुध्दा प्रस्तुत दाव्यामध्ये दाखल केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, बाळा मटकर यांच्या काही मिळकती विभक्त होवून लक्ष्मण हरी मटकर याच्याकडे प्राप्त झालेल्या आहेत व त्याबाबत फेरफार क्र.२८६ ने नोंद झालेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी प्रस्तुत दाव्यामध्ये लक्ष्मण हरी मटकर यांना व त्यांना प्राप्त झालेल्या मिळकतींना समाविष्ट केलेले नाही.

१३. हे म्हणणे खरे नाही की, माझा दावा मिळकतीमध्ये कुठलाही हक्कसंबंध नाही, मी दावा मिळकती बळकवण्यासाठी व वृक्ष अधिकारी यांच्याकडे दाखल केलेल्या तक्रारीमध्ये काहीतरी सबब असावी यासाठी खोटा व खोडसाळ दावा दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा सरतपास दाखल केलेला आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

सही/–

ठिकाण : मालवण
दिनांक : ०६/०३/२०२३

महेश रा. देवकते
सह दिवाणी न्यायाधीश (क–स्तर), मालवण